**<u>नियमित दिवाणी दावा क्र ४४/२०१८</u>**
**निशाणी क्र ६२ पुढे सुरू**

**<u>वादीतर्फे साक्षीदार क्र २</u>**

**नाव— सरिता दत्तात्रय जगताप,**

## <u>पुढील सरतपास वादीतर्फे ॲड यु. बी. पाटील यांचेमार्फत —</u>

**०८.** मी वादी, तसेच प्रतिवादीचे मुले—मुली यांना ओळखते. मी केशरबाई हिने तयार केलेल्या मृत्यूपत्राच्या दस्ताला साक्षीदार म्हणून सही केली आहे. आता मला दस्त क्र. २३४/२०१८ दिनांक १०.०१.२०१८ रोचीचा मृत्यूपत्राचा दस्त दाखविण्यात आला. त्याच्यावर माझी सही आहे, त्यातील मजकुर बरोबर आहे. त्यास निशाणी ६६ देण्यात आला.

## <u>उलटतपास प्रतिवादीतर्फे ॲड ए. जी. कुलकर्णी यांचेमार्फत —</u>

**०९.** माझे वडीलांचे नाव कुंभकरण गोरे असे आहे. शामकर्ण गोरे हे माझे चुलते होते. केशरबाई हि माझी चुलती आहे. माझा विवाह सन १९९६ मध्ये मौजे वांगजी येथे झाला. मी वांगजी येथे सहा वर्ष वांगजी येथे वास्तव्य केले आहे. राजेंद्र याचा विवाह माझया विवाहानंतर झाला होता. माझे पती वांगजी शेती करत होते. ते सन २००३ मध्ये मयत झाले. मला कविताचा विवाहाची तारीख व वर्ष आठवत नाही. तिला मुरुड ता. लातूर येथे दिले होते.

**१०.** हे म्हणणे खरे आहे की, कविताचे पती कल्याण येथे असल्यामुळे ती कल्याण येथे वास्तव्य करते. हे म्हणणे खरे आहे की, केशरबाई हिचे पती राजेंद्रच्या लग्नापुर्वी मयत झाले आहेत. हे मला माहित नाही की, राजेंद्रला दारुचे व्यसन होते. हे मला माहित नाही की, दारुच्या व्यसनामध्ये राजेंद्रने आत्महत्या केली. मला त्याच्या मृत्यूची तारीख आठवत नाही. हे म्हणणे खरे आहे की, प्रतिवादी क्र. २ ते ५ यांचा सांभाळ मयत केशरबाई व वैशाली यांनी केला होता. हे म्हणणे खरे आहे की, दावा मिळकत ही वडीलोपार्जित मिळकत आहे. दावा मिळकतीचा गट नं. ९५ व ७९ एवढेच आठवत आहेत. प्रत्येक गटामध्ये किती क्षेत्र आहे हे मला आठवत नाही.

**११.** मौजे टाका येथे माझी वडलोपार्जित जमीन आहे. तेथे एकत्रीकरणाची योजना आमलात आली आहे अथवा नाही याची मला माहिती नाही. हे म्हणणे खरे आहे की, केशरबाई ही काही दिवस टाका व काही दिवस कल्याण येथे वास्तव्य करत असे. हे मला माहित नाही की, केशरबाई हिला कविताच्या आईवडीलांना काशी वाराणसी येथे दर्शनासाठी नेले होते. हे मला माहित नाही की, कविता आणि केशरबाई यांच्यामध्ये जमिनीच्या वाटण्या झालेबाबत मला माहित नाही.

**१२.** हे मला माहित नाही की, गुडीपाढवा सन २०१६ मध्ये केशरबाई व कविता यांच्यामध्ये जमिनीच्या वाटण्या झाल्या आहेत. हे म्हणणे खरे आहे की, केशरबाई व कविता यांचे जुने गाव टाका येथे घर होते. हे म्हणणे खरे आहे की, भुकंपानंतर गायरानामध्ये वैशाली हिने घर बांधले होते.

**१३.** हे म्हणणे खरे नाही की, सन २०१७ पासुन केशरबाई हि आजारी होती व तिचे मानसिक संतूलन बिघडले होते. हे म्हणणे खरे नाही की, केशरबाई हिचा उपचार लातूर येथील मानसोपचारतज्ञ डॉ रुईकर यांचेकडे सुरु होता. हे म्हणणे खरे आहे की, सन २०१७ मध्ये कविता हिने केशरबाई हिला कल्याण येथे नेले होते. प्रस्तूतचा दावा दाखल केल्यानंतर केशरबाई हिने निशाणी ६६ वरील मृत्यूपत्र तयार केले होते. माझे शिक्षण दहावी झाले आहे. हे म्हणणे खरे नाही की, केशरबाई ही केवळ टाका, कल्याण व मुरुड येथे राहत होती. साक्षीदार सांगते की, ती माझयाकडे देखील राहत होते. हे म्हणणे खरे नाही की, निशाणी ६६ वरील दस्तावर केशरबाईचा पत्ता हा माझया शपथपत्रावरील पत्याच्या विभीन्न आहे. हे म्हणणे खरे नाही की, मृत्यूपत्र करतेवेळी केशरबाई ही वयोवृध्द होती. हे म्हणणे खरे आहे की, मी मृत्यूपत्र वाचुनच त्यावर सही केली आहे. निशाणी ६६ वरील संपुर्ण मजकुर खरा आहे. हे म्हणणे खरे नाही की, मृत्यूपत्र करतेवेळी केशरबाई हि वयोवृध्द असून तिला देहाचा भरोसा नव्हता. मृत्यूपत्र तयार करतेवेळी मी, केशरबाई व बालासाहेब जाधव हे उपस्थीत होते. मृत्यूपत्रातील मजकुर दस्त तयार करणा—याला कोणी सांगितला हे मला माहित नाही. सदरचा दस्त हा पवार नावाच्या इसमाने टाईप केला होता.

**१४.** हे म्हणणे खरे आहे की, निशाणी ६६ वरील मृत्यूपत्र तयार करताना राजेंद्र शामकर्ण गोरे हा मयत झाला होता. हे म्हणणे खरे आहे की, निशाणी ६६ वरील मृत्यूपत्रात राजेंद्र शामकर्ण गोरे हा मयत झाला असल्याविषयी नमुद नाही. हे मला सांगता येत नाही की, निशाणी ६६ वर जमीनीच्या चतु:सिमा नमुद केल्या आहेत अथवा नाहीत. निशाणी ६६ सोबत केशरबाईच्या प्रकृती विषयी डॉक्टरांचे कोणतेही प्रमाणपत्र जोडलेले नाही. निशाणी ६६ सोबत केशरबाई हिचे आधारकार्ड जोडले नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, निशाणी ६६ वरील दस्त तयार करताना केशरबाई हिचे वय ८० वर्षे होते. निशाणी ६६ वरील दस्तावरील स्टॅम्प हा केशरबाई हिने तिच्या नावे घेतला. मला निशाणी ६६ ची नोंदणीची वेळ सांगता येत नाही.

**१५.** बालासाहेब गोपीनाथ जाधव हे माझे मेव्हणे आहेत. ते हुलगापूर—लातूर येथे राहतात. हे म्हणणे खरे नाही की, मी, बाळासाहेब व कविता यांनी संगणमताने लातूर येथे निशाणी ६६ वरील दस्त तयार करुन घेतला आहे. हे म्हणणे खरे नाही की, केशरबाई माझयासोबत राहत होती हे मी खोटे सांगत आहे. केशरबाई हिने सांगितल्यामुळे मी माझया सरतपासातील मजकुर नमुद केला आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझया सरतपासातील मजकुर मला माहित नाही. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादीच्या मुलांना व प्रतिवादीला जमिन मिळू नये म्हणून खोटे मृत्यूपत्र तयार केले आहे. हे म्हणणे खरे नाही की, कविताच्या सांगण्यावरुन आजरोजी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण.**

**फेरतपास नाही.**

**श्रवणोत्तर स्वीकृती**

Digitally signed by PARAG PHADNIS AWATE
Date: 2025.07.23 16:26:19 +0530

**दि २३/०७/२०२५** **श्री. आवटे पी. पी**

**दिवाणी न्यायाधिश व न्यायदंडाधिकारी औसा**